# चैतन्य लहरी

मराठी

मार्च-एप्रिल २०१३



डॉक्टरला आत्मा
बनलं पाहिजे ...४



# या अंकात

वेदना व यातना...१२





तिसऱ्या प्रकारचे रोग सायकोसोमॅटिक असतात, शारीरिक आणि मानसिक. जे सायकोसोमॅटिक असतात त्यांना शरीरापेक्षा मनाचे प्रश्न जास्त असतात. कॅन्सर हा सायकोसोमॅटिक आहे. सर्व व्हायरस हे मेलेल्या वनस्पती किंवा मेलेले प्राणी आहेत. कदाचित मायक्रोस्कोपिक सूक्ष्म जे उत्क्रांतीच्या चलनामधून बाहेर गेलेले आहेत. सामूहिक सुप्त चेतने (कलेक्टिव्ह सबकॉन्शस) मध्ये ते राहतात.



# डॉक्टरला आत्मा बनलं पाहिजे

मॉस्को, २/७/१९९०



वैद्यकीय शिक्षणांत अजूनपर्यंत आपण जे काय शोधलं ते आधीच मिळालेलं आहे. मानवी जाणिवेबाबत जे काय आपण शोधू शकतो त्याला त्याच्या स्वत:च्या मर्यादा आहेत. समजा, असं म्हटलं गेले आहे, की मानवी शरीर परक्या गोष्टी स्वत:च्या शरीरामध्ये स्वीकारत नाही. पण जेव्हा गर्भ होतो त्यावेळी तो बाहेर फेकला जात नाही, तर त्याची योग्य काळजी घेतली जाते आणि योग्य वेळी ते मूल बाहेर येते. त्याचप्रमाणे आपल्या शरीरातील अॅड्रेनलिन आणि अॅसिटीलकोलिन, त्यांची कार्य करण्याची पद्धत समजवता येत नाही. कारण काही वेळा ते जोरात कार्य करतात तर काही वेळा संथ होतात. वैद्यकीयरीत्या संपादन केलेल्या अनेक गोष्टींचे आपण स्पष्टीकरण देऊ शकत नाही. बरंचसं समजून घ्यायचं आहे आणि बरंचसं शोधायचं आहे.

अजूनपर्यंत कोणाला माहीत नसलेलं, पलीकडचं काही तुम्हाला सर्वांना समजावं असं मला वाटतं. त्यामुळे शास्त्रज्ञांच्या खुल्या मनाने स्वत:च पहा, ते खरं आहे, की नाही. तो पर्यंत ते एका सिद्धांताप्रमाणेच आहे. जाणिवेच्या संपूर्णतेचं समग्र चित्र सहजयोग तुम्हाला देतो. सहजयोगात तुम्ही जसे उच्च स्तरावर वाढतां तसे तुम्हाला स्वत:लाच समजते आणि ही महान पद्धत तुम्ही कार्यान्वित करू शकता. प्रथम आपल्याला हे स्वीकारलं पाहिजे, की आपण हे फक्त मानवी शरीर नाही. भावना नाही, अहंकारही नाही किंवा रुढाचारही नाही. पण आपण पवित्र आत्मा आहोत. ही सर्वत्र पसरलेली प्रेमशक्ती आहे, जी हे सगळं काही जिवंत कार्य करते, फुले, फळे निर्माण करते, आपल्यासारख्या मानवांना निर्माण करते. सायन्समध्ये ते प्रेमाची भाषा करीत नाही. पण डॉक्टर्सनांसुद्धा त्यांच्या रोग्यांविषयी प्रेम असतं, नाही तर ते समर्पण करू शकले नसते.

प्रथम डॉक्टरला आत्मा बनलं पाहिजे. त्याच्या डोक्यावर त्याला शीतल व्हायब्रेशन्स समजली पाहिजेत, जी या सर्व विश्वात पसरलेल्या प्रेमशक्तीची फळं आहेत. हे यंत्र तुम्हाला वापरलं पाहिजे. पहिल्यांदा स्वत:ला स्वच्छ करायला नंतर दुसऱ्यांना स्वच्छ करायला. वैद्यकीय शास्त्रांत आपण म्हणू शकतो, की पॅरासिंपथेटिक सिस्टिमची मध्यमार्ग काळजी घेतो आणि उजवी आणि डावी सिंपथेटिक दुसरे दोन मार्ग पहातात. सहजयोगाप्रमाणे डावी आणि उजवी या दोन वेगवेगळ्या शक्त्या आहेत. डावी जी आहे, ती आपल्याला समाधान देते. उजवी मार्गदर्शन करते आणि मधली आपल्याला पापमुक्त करते. हे सर्व साक्षात्कार मिळाल्यावर होतं कारण तुमचा संबंध असावा लागतो.

मानवांमध्ये चक्रे ही मज्जारज्जूमध्ये असतात आणि मेंदूमध्येसुद्धा असतात. ती डावी आणि उजवीकडून तयार होतात आणि दोन्ही एकत्र करून मध्यमज्जासंस्था तयार होते. त्रिकोणाकार अस्थी, ज्यामध्ये कुंडलिनीचा वास असतो तिला सॅक्रम असे म्हणतात. सॅक्रम म्हणजे पवित्र. ग्रीक लोकांना याविषयी माहीत होतं आणि वैद्यकीय शब्दकोशात तो शब्द त्यांनी घातला. सहजयोगानुसार मूलत: आपण तीन प्रकारचे लोक आहोत. प्रथमत: आपण डावीकडे किंवा उजवीकडे जातो. डावी बाजू ही आपली इच्छा आहे आणि जे कार्यान्वित होत नाही ते आपल्या कलेक्टिव्ह सबकॉन्शस-सामूहिक

सुप्तचेतनेमध्ये जातं. आपल्या मनाची ते काळजी घेतं. त्याची सुरुवात अगदी खालून पहिल्या चक्रामधून होते, वर येते, ऑप्टिक चाईसमाच्या इथे क्रॉस करते आणि मानसशास्त्राच्या शब्दांत प्रतिअहंकार तयार करते. जे रुढाचार किंवा कंडिशनिंग्ज असतात. खालचे चक्र पेल्विक प्लेक्सेसचेसुद्धा पोषण करते. आपले उत्सर्जन आणि लैंगिकता यासाठी ते जबाबदार असतात. त्यामुळे लैंगिकतेविषयीच्या कल्पना शहाणपणाच्या असावयास हव्यात कारण शेवटच्या चक्रांतून या नाडीची सुरुवात होते. जेव्हा फ्रॉईडने मानवी मनाविषयी बोलायला सुरुवात केली त्यावेळी त्याने सर्व गोष्टींचा विपर्यास केला. हे चक्र, जे अबोधिततेचे केंद्र आहे, त्याचे व्यवस्थित रक्षण करण्यासाठी लैंगिक सवयी कशा असाव्या हे सांगण्याऐवजी त्याने उलट सांगितले. सर्वांचा संबंध सेक्सशी जोडला. जसे काही मानव म्हणजे कामबिंदू आहेत. स्वत:च्या मतावर आधारीत कल्पना त्याने मांडल्या, की प्रत्येक माणसाला त्याच्या आईविषयी कामभावना असतात आणि त्याच्या बुद्धीला या क्षेपणावर अवलंबून सर्व सिद्धांत त्याने मांडले आणि लोकांना वाटलं, की त्यांना हवी तशी कामेच्छा पुरी करण्यास त्यांना स्वातंत्र्य मिळालं आहे. त्याला कोणी आव्हानसुद्धा दिलं नाही. पाश्चात्त्य देशात त्याला ख्राईस्टपेक्षासुद्धा जास्त मानू लागले. त्याचा परिणाम म्हणून आता आपल्याकडे एडस्, गोनोऱ्हिआ, सिफिलीस वगैरे सर्व सेक्स ऑर्गन्सशी संबंधित रोग आले आहेत. त्यांना नेहमी खाजगी भाग म्हटलं जाई. पण त्याचा अर्थ काय हे कधी समजावून घेतलं गेलं नव्हतं.

डावी बाजू ही सगळे मनाचे प्रश्न असतात आणि उजवी बाजू मन आणि शरीर दोन्हींचे (सायकोसोमॅटिक). जेव्हां तुम्ही खूप काम करतां, खूप विचार करता त्यावेळी सायकोसोमॅटिक प्रश्न होतात. दुसऱ्या चक्रामधील सर्व शक्ती मेंदूमध्ये जाते, जो खूप विचार करतो आणि भविष्यवादी असतो. उजव्या बाजूचे प्रश्न लिव्हर-यकृत, फार गतिमान झाल्यामुळे उद्‌भवतात किंवा पँक्रिआची काळजी न घेतली गेल्यामुळे डायबेटीस होतो. स्प्लिनची-प्लीहेची काळजी घेतली नाही तर ल्युकेमिया-रक्ताचा कॅन्सर होतो. हाय ब्लडप्रेशरचा (रक्तदाब वाढणे) विकार किडनीची (मूत्रपिंड) योग्य काळजी न घेण्याने होतो. जेव्हा लिव्हरची उष्णता वर चढते तेव्हा अस्थमा (दमा) होतो. मेंदू हा स्पंजसारखा असतो आणि तो साकळतो. त्यामुळे उष्णताही मूत्रपिंडाकडे जाते. ती लघवी बाहेर सोडू शकत नाही व मग त्याचे शरीरात व रक्तात अभिसरण होते. त्याचप्रमाणे त्यामुळे बद्धकोष्ठता होते. उष्णता हे रोगाचे लक्षण आहे आणि शीतलता हे आरोग्याचे लक्षण आहे. हेलियम वायूचा प्रयोग दाखवितो, की उष्णता दिली असता सर्व अणू एकमेकांशी झगडू लागतात आणि उष्णता दूर केली, की ते सर्व एकत्रित होतात.

तिसऱ्या प्रकारचे रोग सायकोसोमॅटिक असतात, शारीरिक आणि मानसिक. जे सायकोसोमॅटिक असतात त्यांना शरीरापेक्षा मनाचे प्रश्न जास्त असतात. कॅन्सर हा सायकोसोमॅटिक आहे. सर्व व्हायरस हे मेलेल्या वनस्पती किंवा मेलेले प्राणी आहेत. कदाचित मायक्रोस्कोपिक सूक्ष्म जे उत्क्रांतीच्या चलनामधून बाहेर गेलेले आहेत. सामूहिक सुप्त चेतने (कलेक्टिव्ह सबकॉन्शस) मध्ये ते राहतात.

डॉक्टर एका पातळीपर्यंत समजू शकले आहेत, की ते म्हणतात, प्रथिन त्रेपन्न आणि प्रथिनं अठ्ठावन्न आहेत हे कॅन्सरची सुरुवात करतात. जेव्हा एखादी व्यक्ती शॉकमध्ये जाते त्यावेळी कॅन्सर होतो आणि त्याचा आघात डाव्या बाजूने होतो. आपल्या निर्मितीपासून डावीकडे जी जागा बांधली गेली आहे. इतकं ते डॉक्टर सांगू शकले. ही तीच जागा आहे जी म्हणजे सामूहिक सुप्तचेतन आहे. तिथे मेलेले मानवही भटकत असतात.

फिजिकल सायन्समध्ये, पदार्थ विज्ञानशास्त्रामध्ये काही गोष्टी तुम्ही ऐकल्यादेखील नसतील. सर्व पंचमहाभूतांच्या मूलतत्त्वाची लीला करणारा एक आत्मा असतो. आपल्या शरीराच्या मागच्या बाजूला तो लूप्समध्ये जखडलेला असतो. सर्व सात चक्रांत तसेच सॅक्रम बोनमध्ये तो असतो तो सात लूप्स करतो. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्हाला खूप लूप्स गोल गोल चक्राप्रमाणे जात असलेले एकमेकांत जाणारे दिसतात. काही वेळा बरेचसे एकत्र आले असतात. काही वेळा फक्त एक. हा आत्मा, रिसेप्टर भागांत आपल्यावर प्रतिबिंबित होतो. अलीकडेच अमेरिकेमध्ये पेशीमधील रिसेप्टर भागाचे त्यांनी फोटो घेतले आहेत. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्हाला जसे दिसते अगदी तसेच ते आहेत, पण जेव्हा दुसरा आत्मा व्यक्तीवर बसला असतो तेव्हां त्याचं प्रतिबिंब पेशीवर पडतं. त्याचा प्रभाव रिसेप्टरवरपण पडतो. हा नवा आत्मा कोणत्याही एका चक्राला किंवा सर्व चक्रांना जाऊन चिकटू शकतो. त्याचा पेशींवरसुद्धा परिणाम होतो. आणि ते, ही सर्व डोपामिनची मालिका देतात. ज्या योगे एपिलेप्सी, मानसिक रोग, कॅन्सर वगैरे होतात. जर ते व्हायरस असतील तर ते इतके वाईट नसते. फक्त एखादाच आत जातो आणि प्रभाव पाडतो पण तो एकीकडून दुसरीकडे प्रवास करू शकतो. पण ती जर मानवी पकड असेल तर ते फार कठीण होतं.

हायपरटेन्शन (उच्चरक्तदाब), हृदयरोग, फेफरे (एपिलेप्सी) हे डाव्या बाजूने येतात. अर्धशिशी (मायग्रेन) किंवा डोकेदुखी ही दोन्ही बाजूंनी असू शकते. सर्व अस्थिरोग सायकोसोमॅटिक असतात. ल्यूकेमिया (ब्लड कॅन्सर), ट्यूमर्स, फायब्रोसिल सायकोसोमॅटिक असतो. मेनोपॉज हा रोग नाही. ती एक साधारण गोष्ट आहे. पँक्रियाज सुजणंसुद्धा सायकोसोमॅटिक असू शकतं. सायटिका शारीरिक किंवा सायकोसोमॅटिक असू शकते. सर्व मानसिक रोग डावीकडून उद्‌भवतात. स्किझोफ्रेनिया डावीकडून येतो. दारूचे व्यसन उजवीकडून येते आणि डावीकडे प्रश्न तयार करते. आर्थ्रायटिस सायकोसोमॅटिक आहे. ड्रग्जचे व्यसन, सिगारेटचे व्यसन, होमोसेक्सच्युॲलिटी, भिरभिरणारे डोळे, विकृत लैंगिक व्यसने, लैंगिकबाबातीत जास्त लक्ष असणे सर्व काही डाव्या बाजूचे आणि सायकोसोमॅटिक आहे.

सिगारेट ओढण्याने डाव्या बाजूचे प्रश्न निर्माण होतात कारण त्या व्यक्तीला दोषी असल्याची भावना वाटते. विकृत लैंगिक सवयी, डोळ्यांचे भिरभिरणे, एडस्, विषयासक्त असणे किंवा डाव्या बाजूंमुळे असते. ही एका प्रकारची पकड आहे. मल्टिपल स्क्लेरोसिस ही मधली बाधा आहे. न्युरोसिस



दोन्ही बाजूंनी असू शकते. पार्किन्सन डिसीज डावीकडचा आहे. ऱ्होमॅटिझम नाभीमधून येतो. मस्क्यूलर डिस्ट्रॉफी डावीकडून येते. 'यीपीज डिसीज' हा जेव्हा तुम्ही खूप मेहनतीने काम करतां, पुष्कळ भविष्यवादी असता आणि तुमचं जागृत मन खूपच वापरता, खूप अभ्यास करता तेव्हा जागृत मन पूर्णपणे विस्कळीत होते. तुम्ही व्यवस्थित चालत असता आणि अचानक तुम्हाला जाणीव होते तुम्ही चालत आहात तर तुम्ही अचानक खाली पडता. आठ वर्षापूर्वी मी 'हा रोग येणार आहे' हे अमेरिकेत सांगितलं होतं. एडस् विषयी जवळ जवळ चौदा वर्षापूर्वी सांगितलं होतं पण कोणीच ऐकलं नाही. आता तो खूप गंभीर झाला आहे.

डायबिटीस (मधुमेह) बहुतांशी उजव्या बाजूचा आहे. उजवी बाजू जेव्हा तुम्ही खूपच वापरता तेव्हा खूप थकवा येतो. त्यामुळे तुमच्यावर त्याचा सहज परिणाम होऊ शकतो आणि अचानक पूर्णत्वाशी डाव्या बाजूचं असलेलं संधान सुटतं. ही प्रथिनं जशी त्रेपन्न, अठ्ठावन्न, फार अहंकारयुक्त असतात आणि लहरी असतात. ज्या पेशीला त्यांनी स्पर्श केला ती मॅलिग्नंट बनते. अशातऱ्हेने कॅन्सरचा

प्रादुर्भाव होतो. मग बायकांना वक्षस्थळाचा कॅन्सर होतो. हृदयाचं चक्र हे आईचं चक्र असतं. जेवहा आईच्या आईपणाला आव्हान दिलं जातं. उदा.नवरा स्वैराचारी असला तिला असुरक्षित ठेवत असेल किंवा तिला असुरक्षित वाटत असेल तर या चक्राला बाधा होतात. वयाच्या बारा वर्षापर्यंत हे चक्र रोगांचा प्रतिकार करण्यासाठी 'स्टर्नम' अस्थिंमध्ये अँटीबॉडीज तयार करीत असते. मग त्या सगळीकडे वाटल्या जातात. जेव्हा जेव्हा भीती वाटते त्यावेळी स्टर्नम बोन हादरते. रिमोट कंट्रोलप्रमाणे सर्व अँटिबॉडीजना ते लढा करण्यासाठी संदेश पाठविते. अशा स्त्रीची सुरक्षितता कुंडलिनीचे जागरण करून तुम्ही प्रस्थापित केली तर तिचा कॅन्सर बरा होऊ शकतो. जेव्हा ते खूप पुढे गेलेल्या स्थितीमध्ये असतात त्यावेळी त्यांच्यामध्ये ती इच्छाशक्ती उरली नसते. त्यावेळी वक्षाचा भाग काढून घेऊन तिची सुरक्षितता प्रस्थापित करणे बरे असते.

आळसावलेल्या अवयवांमुळे होणारे काही रोग आहेत. जेव्हा हृदय आळसावलेले असते तेव्हा अंजायना होतो. जेव्हा डाव्या विशुद्धीला पकड असते त्यावेळी तुम्हाला खूप दोषी वाटते. आणि तिथे अडथळा येतो. रक्त डोळ्याकडे जात नाही, त्याला हृदयाकडे जावे लागते. आणि तसे हृदय दमते आणि आळसावते. सहजयोगामध्ये दोन प्रकारचे अवयव आहेत. एक आळसावलेले व दुसरे जास्त कार्य करणारे.

डॉक्टर्सनी प्रथम स्वत:ला व्यवस्थित प्रस्थापित करावे, स्वत:चे रक्षण करावे नंतर ते सुद्धा दुसऱ्यांना बरे करायला शिकतील. ज्यामध्ये व्हायब्रेशन्स आहेत ते फोटो वापरा. सायकोसोमॅटिक्सना पहिल्यांदा फक्त डाव्या बाजूला उपाय केला पाहिजे. काही मुलांना जास्त क्रियाशीलतेचा त्रास होतो. डायबेटिससुद्धा त्याच कारणामुळे होऊ शकतो. जेव्हा आई गरोदर असते त्यावेळी तिने खूप मेहनतीने काम करू नये. तिने जास्त विश्रांती घेतली पाहिजे. तिने जास्त विचार करता कामा नये. पण काहीतरी चांगलं शांतीदायक वाचलं पाहिजे. ध्यान करणे सर्वांत चांगले. त्यावेळी जर आई अत्यंत क्रियाशील असेल, भविष्याचा विचार करीत असेल, तर मुले रोगांसकट जन्म घेतात. ती फार धडपड करीत असतील, तर मुलाला ल्युकेमिया होऊ शकतो. सर्व तातडीच्या सेवेसाठी स्प्लीन असते. कारण ती लाल रक्तपेशी तयार करते. पण जर तुम्ही फार धडपड करीत असाल, सारखे भीतीने धसका घेणारे असाल, धावपळ करीत असाल, तर बिचारी स्प्लीन ते समजू शकत नाही. तीसुद्धा अनिश्‍चित आणि वेड्यासारखी होते. हे मुले किंवा मोठी माणसे कोणाच्याही बाबतीत होऊ शकते.

जेव्हा डावीकडून कसली तरी सुरुवात होते त्यावेळी अचानक शॉक लागतो. कदाचित दु:ख असेल, अपघात असेल, ल्युकेमियाची सुरुवात होते. सर्वांत वाईट गोष्ट जी कोणालाही समजण्यास कठीण असते. ती ही की, नकारात्मक शक्त्या काम करीत असतात. त्या नकारात्मकतेमधून काम करतात. त्या अगुरू, पॅरासायकॉलॉजी किंवा मेस्मोरिझम यांमधून काम करत असतात. तुमच्या आत्म्यावर कोणत्याही प्रकारचा मृतात्मा लादून या गोष्टी करविल्या जातात. आपल्याला फार स्पष्ट



असलं पाहिजे. यांसाठी तुम्ही पैसे आकारू शकत नाही. ही जिवंत क्रिया आहे. उदा.तुम्ही बी पेरता, पृथ्वीमातेला तुम्ही पैसे देत नाही. ती ते करते. हे त्या बीच्या आणि पृथ्वीतत्त्वाच्या मध्ये सामावलेले आहे. पण हे सर्व भयंकर लोक पैशांची हाव असणारे आहेत. त्यांना हृदयाची स्वच्छता किंवा डोक्याची स्वच्छता नाही. त्यांना स्त्रिया, पुरुष सर्व प्रकारच्या घाणेरड्या गोष्टींमध्ये स्वारस्य आहे. ते, ते करतात हे ते सांगू शकत नाहीत. वैद्यकीय शास्त्र किंवा इतर कोणतंही शास्त्र यांच्याशी ते संबंध जोडू शकत नाहीत.

सहजयोगामध्ये गरज असेल तेव्हा हठयोगाचे काही व्यायाम आम्ही करतो. जेव्हा काही शारीरिक समस्यांमुळे चक्रामध्ये बिघाड झाला असेल त्यावेळी तो विशिष्ट हठयोगामधील व्यायाम देण्याचा आम्ही प्रयत्न करतो. पण लोक अशातऱ्हेने हठयोग करतात, जसे ते सर्व औषधे एकाचवेळी घेत आहेत. 'हठ' मध्ये 'ह' आणि 'ठ' दोन्ही नाड्या वापराव्या लागतात. पण हल्ली फक्त 'ह' वापरतात. यामुळे तुमच्यामध्ये मोठं असंतुलन येऊ शकतं. जे लोक हे करतात ते खूप शुष्क, संतापी स्वभावाचे होऊ शकतात. बायकोशी घटस्फोट घेऊ शकतात आणि स्वत:च्या मुलांना टाकून देऊ शकतात.

आपण नेहमी मध्यावर असलं पाहिजे आणि कुंडलिनी नेहमी त्या ब्रह्मचैतन्याशी जोडली पाहिजे. आणि पूर्ण वेळ तुमच्यामधून वहात असली पाहिजे. पण शारीरिक, मानसिक, भावनिक जीवनाशिवाय अध्यात्मिक जीवन तुमच्याकडे आहे. जे फार चमत्कारिक आहे. जे सच्चिदानंददायी आहे. ही प्रेमशक्ती सर्व गोष्टींची कशी काळजी घेते हे जेव्हा तुम्हाला समजतं त्यावेळी तुम्ही अचंब्यात पडता.

# वेदना व यातना





# आक्रमक वृत्ती

पाश्चिमात्य लोक दुसऱ्याच्या संस्कृतीबद्दल आक्रमक आहेत. आक्रमकता जरी कोणावर केली किंवा आपण कोणाकडून घेतली तरी दोन्ही बाजू सारख्या चुकीच्या आहेत. (दि.२२.४.१९७९) म्हणून मानवाने आक्रमकता सोडून दिली पाहिजे. शिवाय आता मानवजात सहजयोगी झालेली आहे. त्यांनी आता स्त्रियांची कोमलता (मार्दव) इ.गुण स्वीकारले पाहिजेत. भांडणाचे, लढाई करण्याचे गुण नकोत आणि जर स्त्री भांडण करू लागली तर त्या स्त्रिया नाहीत. (दि.२१.८.८३)

जर तुम्ही जड वस्तूसाठी व्याकूळ झालात किंवा त्याबद्दल अतिदक्ष राहिलात किंवा त्याबद्दल अतिकार्यक्षम राहिलात तर आपला अहंकार फुगतो आणि आपण हिंसेमध्ये अडकतो कारण तुम्ही अधिक काही निर्माण केलेत तर त्याबद्दल उल्लंघन करावे लागते. त्यापेक्षा ते कसे विकावे हे तुम्हाला समजत नाही. तुम्ही एकप्रकारचे आक्रमक व्यापारी बनता. (दि.२७.९.१९८०)

# ॲलर्जी

त्वचेचा रोग हा सुस्त यकृताचा परिणाम आहे. स्वाधिष्ठान चक्राच्या डाव्या बाजूवरील असंतुलनामुळे हा परिणाम जाणवतो. (दि.१३.३.१९८४) डाव्या स्वाधिष्ठानच्या असंतुलनामुळे तुमचे अवयव सुस्त बनतात. त्याचा परिणाम म्हणून त्वचेचे रोग होतात. नसा संस्थांची समस्या, कर्करोग, रक्ताचा कर्करोग हे रोग या सुस्त अवयवांचा परिणाम आहे. त्यामध्ये यकृताचा विकार, पुरळ व त्वचारोग होतात. लोकांच्या सुस्त यकृतामुळे सर्वप्रकारचे रोग होऊ शकतात.

# अल्झायमर

जर एखादी व्यक्ती प्रमाणाबाहेर आक्रमक असेल, लोकांना यातना देणारी असेल तेंव्हा ती व्यक्ती वृद्ध झाल्यावर त्यांचा मेंदू भलतीकडे वाहत जातो आणि त्यामुळे वाईट प्रवृत्ती काम करू लागतात. अशा व्याधीग्रस्त व्यक्तीला त्याचे भान नसते आणि तुम्ही ते बरे करू शकत नाही. परंतु जर तुम्हाला तुमच्या जीवनकाळात आत्मसाक्षात्कार मिळाला तर तुम्ही पूर्णत: तुमच्या आत शांत असता आणि अशा प्रकारचा रोग स्पर्श करू शकत नाही.(दि.५.७.१९९८)

# क्रोध

क्रोध हा यकृतापासून निघतो आणि तो विशुद्धीद्वारे प्रकट होतो. चेहरा लाल होतो. डोळेपण लाल होतात व तोंडाद्वारे सर्व प्रकारच्या भयंकर गोष्टी बोलल्या जातात. तुम्ही जेंव्हा रागावता तेंव्हा सर्व भाव अगदी वेगळे असतात. हा क्रोध कुठून येतो ते पाहिले पाहिजे. तो यकृतामधून येतो. त्यावर ताबा ठेवण्यासाठी तुम्ही प्रथम स्वत:ला पूर्णपणे सामोरे गेले पाहिजे. हा सर्वात वाईट शत्रू आहे. श्रीकृष्णांनी तसे म्हटले आहे. काही लोकांना डोळ्यामधून क्रोध दर्शविण्याची सवय असते. क्रोधाने भरलेले डोळे, डोळ्यांबाबतीत आणखीनच धोकादायक गोष्ट आहे कारण ते संमोहित होऊ शकतात. (दि.२३.८.१९८६)

क्रोध ही आपल्याजवळ असलेली अत्यंत वाईट गोष्ट आहे, पण काही लोक त्यांच्या क्रोधाचा अभिमान बाळगतात. क्रोध पूर्णपणे मूर्ख असल्याची खूण आहे. कोणावरही रागवण्याची गरज नसते. त्याने तुम्ही समस्या सोडवू शकत नाहीत. क्रोधाने तुम्ही स्वत:लाच बिघडवता. तुम्ही तुमचा स्वत:चा स्वभाव नष्ट करता. तुम्ही सर्व स्थिती खराब करता. जर तुम्हाला राग येईल अशी घटना घडली, तर तुम्ही शांत राहून स्वत:चा विचार करून पहावा. कां हे असे चुकीचे घडले? कां तुम्हाला ते त्रास देतात? तुमचे हे स्वत:चे पाहणे जी समस्या सोडवायची आहे त्याकरीता उपयोगी पडेल. (दि.१०.५.१९९८)

तुमच्यामध्ये क्रोध कधीही ठेऊ नका. तो तुमच्या यकृतामध्ये येतो. तुम्ही कदाचित क्रोध दाखविणार नाही, परंतु तो आतमध्ये असतो. तो बाहेर काढा आणि यकृत स्वच्छ करा. जर तुम्ही क्रोध साठवत गेलात आणि तो सांभाळून ठेवलात तर तो तुमचे यकृत होरपळून टाकेल म्हणून सर्वात चांगली गोष्ट तो बाहेर काढून टाकणे. एखादी उशी घ्यावी आणि तिला जोराने मारावे किंवा अशा कोणत्याही मार्गाने तो बाहेर काढावा. (दि.४.९.१९८१)

फक्त एकच अशी वेळ आहे, तुम्ही खरोखरच रागावले पाहिजे. ती म्हणजे जेंव्हा तुम्ही तुमच्या आईच्या विरोधात किंवा सहजयोगाच्या विरोधात तुम्ही काहीही सहन करू शकत नाही. जेंव्हा एखादा महाभयंकर क्रोध करतो तेंव्हा आत्मसाक्षात्कारी व्यक्तीने रागवू नये असे म्हणणे चुकीचे आहे. क्रोध जेंव्हा उत्स्फूर्त येतो तेंव्हा काहीही करण्याची गरज नसते. मी माझे पाहून घेईन. परंतु ती प्रतिक्रिया बरोबर आहे. (दि.१५.२.१९७७, २१.९.१९८८) श्री गणेश जर रागावले तर त्यांना घाबरले पाहिजे. ते लहान मुलांसारखे निरागस आहेत. तरीपण ते अतिशय क्रोधित होऊ शकतात. (१५.२.१९७७)

जेंव्हा तुम्हाला रागासारखे काही वाटू लागते तर तुम्ही असे करावे, समजा एखाद्या सैतानी गुरूच्या विरोधात राग आला तर तो तुम्ही तुमच्याजवळ ठेवा आणि मग तुमच्याजवळ ठेवलेला क्रोध निष्फळ ठरेल. तो तुम्ही मोठ्याने व्यक्त करण्याची गरज नाही. तो मोठ्याने सांगण्याची गरज नाही. तो रोखून ठेवलेला राग थोडाफार तुम्हाला त्रास देईल कारण त्याला थोडीफार प्रतिक्रिया आहे, पण तो सोडून दिलात तर तो परिणाम दाखवेल, अशी व्यक्ती सहजयोगी समजता येणार नाही. (दि.१०.३.१९८५)

# अस्थमा

तुमचे जर उजवे हृदय पकडत असेल तर तुम्हाला अस्थमा होऊ शकतो. कधी तुमचे मध्य हृदय पकडल्यानेही अस्थमा होऊ शकतो. हा रोग सहजयोगात पूर्णपणे बरा होऊ शकतो. अस्थमा उजव्या बाजूच्या माणसांनाही होऊ शकतो.

जर तुमचा पती खराब असेल किंवा तुमची पत्नी धूर्त असेल किंवा जर तुमचे वडील खराब असतील, तुमच्याशी दयाळूपणे वागत नसतील किंवा जर तुम्ही वडिलांना क्षमा केली नसेल तर तुम्हाला अस्थमा होऊ शकतो. (दि.१.८.१९८९) अस्थमा तुमच्या वडिलांच्या नात्यामध्ये काही दोष असेल, सहनशीलता असेल (दि.५.१०.१९८१) किंवा जर वडीलत्व चुकीचे असतील किंवा त्याला आव्हान दिले गेले असेल अथवा तुम्हाला तुमच्या वडिलांबद्दल आदर नसेल, जसे समजा तुमचे वडील तुमच्या लहानपणीच वारले असतील आणि तुमच्या आयुष्यात, एकप्रकारे तुमच्या हृदयात उदासीनता, असुरक्षितता निर्माण झालेली असेल त्यामुळेदेखील ते पकडत असेल, म्हणजेच याचा अर्थ असा की ते अजूनही तुमच्या अवतीभोवती फिरत आहेत. त्यावेळी तुम्हाला तुमच्या वडिलांना सांगावे लागते, की ‘मी ठीक आहे. आपण आपला पुनर्जन्म घ्यावा व आपण आत्मसाक्षात्कार घ्यावा.’ अशाप्रकारे ज्या लोकांना २५ वर्षापासून अस्थमाचा असलेला त्रास बरा झालेला आहे. (दि.८.६.१९७९)

वडिलांचे सर्व गुण उजव्या हृदय चक्रात असतात. (दि.११.७.१९८२) हे अत्यंत सूक्ष्म केंद्र आहे....ते श्रीराम नियंत्रित करतात......आदर्श राजा व वडील.......(दि.२९.८.१९८१) तेथे वडिलत्वाचे गुण वास्तव्य करतात. पती व वडील यांचे गुण आणि तेथे तुमचा अस्थमा वाढीस लागतो. जर वाईट वडील अथवा वाईट पती असेल तर........ (दि.१.८.१९८९) या केंद्रास पकड आणते जर वडील वारले असतील आणि त्यांना जगण्याची इच्छा नसेल अथवा वडील मुलांबरोबर दयाळूपणे वागलेले नसतील......अथवा वडील क्रूर, दुःखी अथवा हरवलेले असतील इ.परिणामी अस्थमा होऊ शकतो. याला ठीक करण्यासाठी या चक्रावर हात ठेवून आपल्यातील वडिलत्व जागृत करण्यासाठी मंत्र म्हणावेत.(दि.११.७.१९८२)

म्हणून आपल्यात सहजयोगाची पद्धत आहे की त्यात जेंव्हा आपण एकमेकांशी बोलतांना आपल्यातील श्रीरामांचा संकोच असावा. जर तुमच्यात तो संकोच नसेल तर उजवे हृदय पकडते आणि उजवे हृदय ही धोकादायक गोष्ट आहे. इंग्लंडसारखे हवामान असलेल्या प्रदेशात हे अतिशय वाईट आहे कारण त्यामुळे अस्थमासारखा भयंकर आजार उद्भवतो. म्हणून हा संकोच प्रत्येकाने शिकावा. मर्यादा म्हणजेच हद्द, सीमारेषा आपल्या नात्याबाबतच्या आहेत.(दि.२.४.१९८२)



# भुतं

मृत.....जी माणसे मृत झालेली आहेत......आपल्या सभोवताली लटकतात आणि प्रश्नांचे कारण बनतात (दि.२९.८.१९८१, ११.८.१९९०/१) आणि वेडेपणाच्या कृत्याचे कारण होऊ शकतात (दि.६.८.१९८९) चर्च.......ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थना मंदिराभोवती अस्तित्वात असतात कारण तेथे मृत शरीरे पुरलेली असतात. (दि.११.७.१९८२) जे मृत आत्मे जे आत्तापर्यंत कोणत्यातरी गोष्टींबरोबर लिप्त आहेत...कदाचित मुलांना, घराला, पिण्याच्या सवयीला, मूर्खपणाच्या काही गोष्टींना.....ते आत्तापर्यंत भोवताली लटकत आहेत आणि ते जे आपल्याला त्रास देतात, आपल्याला खूपच भंडावून सोडतात ते समूदायात असू शकतील, ते पुष्कळ असतील, वेगवेगळ्या प्रकारचे असतील. त्यांच्या सोबत अतिशय वाईट सुप्तमनाच्या हालचाली कृती असतील किंवा सोबत सुप्त अवचेतनसुद्धा; आता काही अडचणींना तुम्हाला सामोरे जावे लागेल की ज्या सुटणार नाहीत, त्या मृत आत्म्यांकडून आलेल्या असू शकतील. म्हणून उत्तम मार्ग म्हणजे त्यातून सुटका करून घेणे. आपल्या जीवनाबद्दलच्या दृष्टिकोनात अलिप्तता वाढविणे. (दि.२५.६.१९९५)

बाधा व भूत यामध्ये फरक आहे. बाधा म्हणजे व्यत्यय. ती आपल्या चैतन्य लहरींची जाणीव थांबविते (दि.१६.६.१९७९) आणि त्याचा वर्तमानात दुहेरी पेशींचा फास (लहान

वर्तुळाकार बंधन) आपल्याला मायक्रोस्कोपखाली दिसतो.(दि.२५.७.१९८९) बाधा म्हणजे 'अडथळा' तो नेहमी अवयवांचा किंवा चक्राचा असतो आणि जर तो हलला तर तो कुंडलिनीच्या हालचालींना प्रतिसाद (प्रतिक्रिया) देतो किंवा तुमच्या बोटांना प्रतिसाद मिळतो. भूत लहरीनुसार स्वच्छंदी हालचाली करते. इकडे व तिकडे अशा हालचाली करते. डावीकडून उजवीकडे आणि आपल्या हाताच्या बोटांच्या हालचालीच्या अंमलाखाली (बंधनात) नसते. ते लहरीनुसार फिरत राहते. अगदी स्वत:च्या स्वच्छंदाने. उलटपक्षी दुसरा तुमचा स्वत:चा ताबा असतो. (दि.१७.५.१९८०/२) बाधा अग्नीद्वारा/ज्योतीद्वारे जाळल्या जातात आणि ज्योतीच्या फडफडण्याद्वारे आपण पाहू शकतो. (दि.५.१०.१९७८) आणि मेणबत्तीद्वारा भूते ही जाळता येतात आणि फट् फट् फट् आवाज करतात. मेणबत्ती वापरावी लागते.(दि.९.२.१९९२)

अर्थातच प्रथमत: तुमच्यात न शिरकाव करू देता भूतांना हाकलावे. प्रथम स्वत:ला बंधन घेणे. तिथे निरनिराळ्या भुतांनुसार वेगवेगळे मार्ग आहेत. जो भूताने पछाडलेला आहे त्याच्याबरोबर सामना करताना तुम्हाला आक्रमक दृष्टिकोन उच्च स्थितीला ठेवावा लागतो. त्या माणसांबरोबर मोठ्या स्रोतासह जावे लागते. तिथे कोणतीच तडजोड नाही. त्याला म्हणावे, 'खाली बस.' त्यानंतर अडचणींचे स्वरूप असेल त्या प्रसंगानुसार प्रश्न विचारा. (दि.१७.५.१९८०/२)

**१. गुरू भुते -** स्वत:ला बंधन घेतल्यानंतर विचारा की कोणत्या तरी गुरूकडे गेला होतात कां? कोण आहे ते शोधून काढा. अजूनही त्या गुरूवर विश्वास आहे कां ते विचारा. तो जोपर्यंत क्षमा मागत नसेल तर त्याला सांगा 'आम्ही मदत करणार नाही. निघून जा.' पण तो म्हणाला, 'होय, मला त्रास आहे. मी अडचणीत आहे. मी पछाडला गेलो आहे.इ.' तर मग तुम्ही सुरू ठेवा. त्याला त्याच्या गुरूचे नांव विचारा, त्याचा मंत्र कोणता आहे? तो त्या गुरूसोबत किती वर्षे आहे इ. त्यामुळे मंत्र कोणता वापरला आहे ते कळेल जर त्याचा गुरूसंबंधीचा त्रास/प्रश्न असेल तर आदिगुरूमंत्र भवसागराकरिता म्हणावा. त्याला मंत्र बोलण्यास सांगा किंवा फोटोसंबंधी प्रश्न विचारा. कुंडलिनी प्रतिसाद देईल. तुमच्या तोंडासमोर फोटो ठेवा. मास्कप्रमाणे तुम्ही प्रकट होण्यास परवानगी देऊ नका. जर तुम्हाला गुरूचे नांव माहीत असेल तर तुम्हाला कोणता मंत्र वापरावा, उपयोगात आणावा ते समजेल. असे नरकासूरमर्दिनी, महिषासूरमर्दिनी किंवा सर्व असूर मर्दिनी, नंतर चैतन्य लहरीयुक्त मीठ-पाणी पिण्यास द्यावे हे उत्तम. त्याला सांगावे हे कठीण आहे. ते सर्वात भयंकर आहे. आपल्याला माहीत आहे. त्यासाठी वेळ घ्यावा लागेल. कठीण प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यापासून सुटका मिळविण्यासाठी. परंतु ते सर्व ठीक आहे आणि घाई करू नका. त्यासाठी वेळ द्यावा लागेल. ही गुरुभुते भयंकर धोकादायक असतात. (दि.१५.७.१९८०/२)

दुसरा प्रकार म्हणजे ती माणसाला आंधळे बनवतात. जरी डोळे सर्वसाधारण दिसत असले व उघडे असले तरी. डाव्या स्वाधिष्ठान चक्राला पकड येत राहील. तिथे दोन प्रकारचा आंधळेपणा असतो. ते भूत असेल किंवा डायबेटीस असेल अथवा दोन्हीचे एकत्रीकरणही असेल. डायबेटीस आहे का ते विचारा. जर डायबेटीस नसेल तर भूत आहे हे निश्चित. त्यापासून मुक्तता मिळविण्यास बरे होण्यास हाताचा फोटो

वापरा आणि समोर मेणबत्ती ठेवा आणि त्याला विचारा की प्रकाश दिसतो आहे का? त्यानंतर हळूहळू त्याला हात दिसू लागेल. मेणबत्ती एकटी काम करू शकणार नाही, पण तुम्ही हात प्रकाशात पाहू शकाल. तर मग ते खूपच चांगले आहे डोळ्यांसाठी. कदाचित घाबरण्याची शक्यता आहे. जसे, उदा.घर जळत आहे ह्यावेळी भूत उडी मारू शकेल कारण आंधळेपणामुळे, पण डोळे अग्नीने जळतील आणि उघडे राहू शकणार नाहीत. आंधळेपणा भूताचा असू शकतो. (दि.१७.५.१९८०/२)

भुते उठतात व सर्व ट्रिक्स करतात. जसे तुम्हाला देवीकडून हार बाहेर येत आहे असे जाणवेल आणि तुम्ही विचार कराल की अरे, हा काय चमत्कार आहे? पण ते भूत असेल. (दि.३०.५.१९७९) जर तुम्ही कोणत्याही माणसाकडे आकर्षित असाल, विचार करा, 'तो माणूस' भूत आहे आणि मीदेखील भूत आहे. फक्त भूतच असे आकर्षण असते.(दि.४.९.१९८१)

जर तुम्ही तुमची नजर एकटक कोणाकडे लावलीत तर तुमचे डोळे संमोहित होतात. याचा अर्थ असा आहे की डोळ्यातून भूते बाहेर येण्याची सुरुवात झाली आहे. सर्वात प्रथम आपण भूताला आपल्या डोळ्यात पकडतो नंतर तिथे ते स्थिर होते. नंतर ते दुसऱ्या माणसांवर भूत म्हणून पडते. हे अतिशय अत्यंत धोकादायक आहे की काही गोष्टींकडे सातत्याने एकटक पाहत राहणे. (दि.२३.८.१९८८)

थोडेसे खोबरेल तेल रात्री डोक्यावर घालून मॉलिश करणे, चोळणे ही गोष्ट सहजयोग्यांसाठी अतिशय उत्तम आहे आणि सकाळीदेखील. त्यानंतर पाहू नका. तुमचे केस चांगल्याप्रकारे विंचरा (बांधा), भांग पाडा. जर तुमचे कपडे व केस भुतासारखे असतील तर भुते प्रवेश करतील. विचार करतील की ओहो, येथे भूत बसलेले आहे आणि त्या भूताचा ताबा घेणे चांगले म्हणून चांगला ड्रेस पद्धतशीर घाला. तुमच्या कपाळावर केस अजिबात येऊ देऊ नका. ते सरळ ठेवा. नीट ठेवा आणि तुमचे कपाळ पूर्ण स्वच्छ असू द्या.(दि.४.५.१९८६)

जे ध्यानधारणा करीत नाहीत, उथळ, वरवरचे असतात, ते काहीही मिळवू शकत नाहीत. ते फक्त अडचणी निर्माण करतात. जर ते उजव्या बाजूचे असतील ते सुप्त अवचेतनेत जातात. ते भुते बनतात. जर ते डाव्या बाजूचे असतील ते फेकले जातील. (दि.२९.६.१९८५) कधी कधी आपली आई आपल्याला ओरडते. अगदी अचानक ती ओरडते आणि लगेचच भुते पळतात. (दि.१३.१.१९८३) आपण सुधारणा स्वीकारली पाहिजे कारण आपल्याला आपले उत्थान, वाढ, मोठेपण हवे आहे. (दि.१६.१०.१९८७)

# वर्चस्व

वर्चस्वाचा प्रश्न....स्त्रीने पुरुषावर वर्चस्व गाजवावे किंवा पुरुषाने स्त्रीवर वर्चस्व गाजवावे हा प्रश्न सहजयोगात येत नाही. कोणत्याही प्रकारचे वर्चस्व असू शकत नाही. प्रत्येकाने पाहिले पाहिजे, की डावी बाजू डाव्या जागेवर स्थिर आहे आणि उजवी बाजू तिच्या योग्य जागेवर आहे. म्हणून आपण दुसऱ्या बाजूला जे आहे ते मागू नये. याप्रमाणे म्हणजे पुरुषांना मुले व्हावीत व स्त्रियांनी दाढी-मिशा वाढविण्याची इच्छा करावी. (दि.३.१२.१९८७)

दोन्ही बाजूंवर पुरुषांची किंवा स्त्रियांची असो आपल्याला समजून घेतले पाहिजे की जर तुम्ही पुरुष आहात आणि पुरुषावरच वर्चस्व करत असाल तर एकवेळ ठीक आहे. परंतु तुम्ही स्त्री आहात तुम्ही वर्चस्व गाजवत असाल तर ती गोष्ट सहजयोग्यांसाठी अत्यंत अवघड आहे कारण तुम्ही स्त्री होण्याची गुणवत्ता गमावून बसला आहात. सुरुवातीला कमीत कमी तुम्ही स्त्रीसारखं असलंच पाहिजे. आता जर पुरुष वर्चस्व करीत असतील तर त्यांनी समजून घेतले पाहिजे की त्यांच्याकडे करुणा, दयाळूपणा, विचारीवृत्ती असली पाहिजे, परंतु वर्चस्वाला पोषक असता कामा नये आणि कधीच असू नये.

# एड्स

एड्स रोगासाठी तांबे हे जबाबदार आहे. झांबिया येथून ते येते. माकडांद्वारे ते आणले जाते, तरीदेखील त्यांना एड्स रोग होत नाही. (दि.२५.७.१९७९) एड्स रोगाच्या लक्षणापैकी एक लक्षण आहे. बिघडलेले हंस चक्र. बिघडलेल्या हंस चक्राला सुधारण्यासाठी नाकामध्ये तुपाचे थेंब टाकणे हे फार महत्त्वाचे आहे. नाहीतर एड्स रोगाची शक्यता राहू शकते. (दि.३.५.१९८७)

पश्चिमेकडील देशांमध्ये सहजयोगाची एक समस्या आहे ती त्या लोकांना आपण नीतिमान रहावे असे सांगितल्यावर तेथील लोक ऐकून घेत नाहीत. त्यांना ते फार कठीण वाटते. परंतु मूलभूत गोष्ट अशी आहे, की आपण नीतिमान असलेच पाहिजे. आता ते त्यांच्या वागण्याचा परिणाम पहात आहेत. तो म्हणजे त्यांना एड्स रोग असतो. तसेच याप्रमाणे सर्वच रोग असतात. या सर्व त्रासांपासून ते शिकत आहेत की आपले मूलाधार ठीक ठेवावेच लागते. आधुनिक काळामधील महापाप जे आहे ते म्हणजे अनीतीचे. श्रीमातेविरूद्ध केलेले पाप जे कर्करोग निर्माण करते. कर्करोगामुळे उष्णता निर्माण होते. त्याला देवीच्या विरोधात केलेले पाप म्हटले जाते. परिणामी मानसिक किंवा शारीरिक रोग होतात. जसे एड्स रोग आणि कर्करोग ही एक उशिरा झालेली शिक्षा असते. (दि.९.१०.९४, १३.१.१९८३)

मध्य हृदय अगदी बिनचूकपणे लोकांना एड्स रोगाचा विकार देते. (दि.१.८.१९८९)



# अंधत्व (ब्लाइंडनेस)

दृष्टीचा अभाव फक्त दोन कारणाने असू शकतो. एकतर मधुमेहामुळे किंवा भुताने पछाडल्यामुळे (दि.६.१०.१९८१) ज्याचे डोळे उघडे आहेत, पण तो माणूस पाहू शकत नाही...तो सुप्तचेतनेमुळे बाधित झालेला आहे आणि सामूहिक सूक्ष्मचेतन की ज्यामधून आत्मे हल्ला करतात. (दि.९.२.१९८३)

डाव्या बाजूचा रोग (दि.१७.५.१९८०/२)-एक प्रकारचे भूत-ते माणसाला आंधळे बनविते. त्याचे डोळे सर्वसामान्यांसारखे दिसले व उघडे असले तरीही ते माणसाला अंध करतात. डावे स्वाधिष्ठान चक्राला पकड येते. तिथे दोन प्रकारचा आंधळेपणा असतो. एक तर ते भूत असेल अथवा मधुमेह असेल किंवा दोन्ही गोष्टींचा समावेश असेल. मधुमेह आहे का ते विचारा. जर मधुमेह नसेल तर निश्चितपणे ते भूत आहे ते बरे करण्यासाठी हाताचा फोटो घ्या. त्याच्यासमोर मेणबत्ती ठेवा आणि त्या माणसाला पहायला सांगून प्रकाश पाहू शकतो का ते विचारा. तुम्हाला आश्चर्य वाटेल हळूहळू त्याला प्रकाश दिसू लागेल आणि हळूहळू तो हात पाहू शकेल. मेणबत्ती एकटीच काम करू शकणार नाही, पण प्रकाशासह जर हात पाहिले तर ते अतिशय चांगले डोळ्यांकरीता आणि आंधळेपणा जर भुतामुळे असेल तर भीती वाटेल. उदा.घर त्यावेळी जळत आहे असे वाटेल. भूत त्यात उडी मारेल आंधळेपणामुळे. पण अग्नीमुळे डोळे जळतील उघडे राहू शकणार नाहीत. जर डोळ्यांच्या आंधळेपणाचे कारण भूत असेल तर हे शक्य आहे. (दि.१७.५.१९८०/२)

मधुमेह या आजारामुळे डोळ्यांची दृष्टी जाते. (दि.६.१०.१९८१) आधुनिक युगामधला मधुमेह सामान्य आजार आहे आणि डॉक्टर तो बरा करू शकत नाहीत. आपण अगदी नि:संशय तो बरा करू शकतो. स्वाधिष्ठान नावाचे एक केंद्र आहे त्यामुळे मधुमेह होतो. आपल्या शरीरातील स्वाधिष्ठान नावाचे जे चक्र आहे ते Aortic Plexus वर कार्य करते. हे Aortic Plexus आपल्या शरीरातील पँक्रियाज, स्प्लीन, मूत्रपिंड आणि यकृत यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते.(दि.२०.७.१९७९) मेंदूला उपयोगी अशा फॅटसेलच्या उत्पादनाची देखभाल केली जाते. (दि.१.८.१९८९) आता जेंव्हा तुम्ही विचार करता तेंव्हा प्रत्येक मिनीटाला मेंदूला पेशी (सेल्स) रिप्लेस केल्या जातात. पोटामधील चरबीच्या पेशी स्वाधिष्ठान केंद्राकडून मेंदूकडे पाठवल्या जातात व तेथील फॅट सेल्स बदलण्याचे कार्य प्रत्येक मिनीटाला केले जाते. (दि.८.१०.१९८२) आणि जर स्वाधिष्ठान चक्राचा ताबा गेला तर मेंदूला फॅट सेल पुरविणाऱ्या अवयवांवर परिणाम होतो. त्यामुळे परिणामी मधुमेह अशक्त पॅनक्रियाजमुळे होतो. (दि.१.८.१९८९, ५.१०.१९८१) तुम्ही पहाता मधुमेह का वाढतो? मदुमेहामुळे डोळे खराब होतात. मधुमेह या रोगात फॅट्स योग्य पद्धतीने खर्ची पडत नाहीत आणि मेंदूला पुरेशा प्रमाणात पुरविले जात नाहीत. ऑप्टीक लॉबीजकडे जात नाहीत. मेंदू चरबीच्या पेशीने बनला आहे म्हणून तुम्हाला हा त्रास होतो. जर डोळ्यांसाठी चरबीच्या पेशी वापरात आल्या तर तिथे प्रश्न उद्भवणार नाही. (दि.१४.२.१९८४) लोणी स्वाधिष्ठानास महत्त्वाचे आहे. ते मेंदूच्या पेशीला रूपांतरासाठी उपयोगी पडते (दि.५.१०.१९८१) फॅट्स, लोणी याशिवाय शरीर कर्बोदके राखू शकत नाही. (दि.२.२.१९८३)

जर तुम्हाला आंधळ्या, मुक्या व बहिऱ्या माणसांना आत्मसाक्षात्कार द्यायचा असेल तर तुम्हाला फोटोग्राफ वापरणे गरजेचे आहे. त्यासमोर प्रकाश ठेवा. त्यांना सांगा तिथे फोटो ठेवलेला आहे आणि फोटोग्राफकडे उजवा हात अथवा डावा हात करण्यास सांगावे. त्यावर अवलंबून रहावे आणि मागच्या बाजूला ते मुके असतील तर.....तुम्हाला एक लाईट घेऊन (मेणबत्ती) प्रकाशाच्या सहाय्याने बंधन द्यावे. मागच्या बाजून बंधन द्यावे. जर ते आंधळे असतील......जर ते त्यांच्या कानाने काहीही ऐकणारे नसतील तरीही...(०.००१२)

काही माणसांना काही कोनामध्ये दृष्टी ठेवून पाहण्याची सवय असते. (सतत तिरके राहून पहाण्याची सवय असते) ते सरळपणे पाहूच शकत नाहीत. कधीकधी तर त्यांना वाटते ही फॅशनच आहे आणि काही जणांचे डोळे असे असतात की ते अशा तऱ्हेने पहात राहतात की त्यांच्या डोळ्यांमधून दुसऱ्यांकडे हाव, लालसा किंवा लोभ दुसऱ्याकडे ओतला जात आहे किंवा त्यांची तीव्र तृष्णा, वासना दुसऱ्यांकडे आहे...ही डोळ्याने केली जाणारी अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे कारण अशी माणसे सहजगत्या आंधळी होऊ शकतात. त्या अशा माणसांना डोळ्याचा त्रास होऊ शकतो. विशेषत: अशा लोकांचे डोळे खूपच लालभडक होतात (दि.२३.६.१९८६) केसांना रंगविल्यानेही आंधळेपण येऊ शकते. (दि.०.५.१९८७)



...... मी तुमच्याबरोबर प्रत्येक पावलावर, प्रत्येक ठिकाणी आहे. प्रत्येक ठिकाणी, तुम्ही जिथेपण जाल. वैयक्तिक स्वरूपात, मनाने, हर प्रकारे प्रत्येक ठिकाणी मी तुमच्या बरोबर आहे. तुम्ही जेंव्हा पण माझी आठवण काढाल.... मी आपल्या संपूर्ण शक्तींबरोबर तुमच्या जवळ असेन असे मी तुम्हाला वचन देते.

प.पू.श्रीमाताजी, २७.५.१९७६

✦ प्रकाशक ✦

निर्मल ट्रांसफॉर्मेशन प्रा. लि.

प्लॉट नं.८, चंद्रगुप्त हौसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८. फोन : ०२०- २५२८६५३७, २५२८६७२०, e-mail : sale@nitl.co.in



गुढीपाडवा - या दिवसाला शालिवाहनांचे नववर्ष म्हंटले जाते. ही शाल (जी गुढीच्या वर लावली जाते) तुमच्या माताजींचे आवरण आहे आणि त्यांना ऊब (warmth) देते आणि शालिनतेने झाकते. ही शाल ऐश्वर्य, विनम्रता, पावित्र्याचे प्रतीक आहे. तुम्ही तुमच्या आईच्या मदतीने त्यांचे शिष्य बनून उभे रहा. तुम्ही श्रीगणेशाप्रमाणे तिचे रक्षण करा.

